बदल आपण स्वीकारायला हवेत.

पण त्याचबरोबर आपली संगीत नाटकाची परंपरा टिकावी, जोपासली जावी असं मला मनापासून वाटतं. माझ्या दृष्टीनं परंपरा टिकवणं म्हणजे सौभद्र, मानापमान, स्वयंवर अशा त्या कालखंडातल्या, त्या परंपरेतल्या नाटकांचे त्या अभिनयशैलीत, तशाच नेपथ्यात, त्याच संगीतात अनेक प्रयोग सातत्यानं होत रहाणं. भरत नाट्य मंदिर सारख्या अनेक संस्था हा प्रयत्न करताना दिसतात. पण मोजकेच प्रेक्षक आणि अपुरे अर्थबळ यामुळे हे प्रयत्न तोकडे पडतात.

सांस्कृतिक परंपरा जोपासणं हे शासनाचं कर्तव्य आहे. हा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी मी शासनाकडे दरवर्षी फक्त पंचवीस लाख अनुदानाची मागणी करीत आहे. शासनाच्या दृष्टीनं ही तशी फार मोठी रक्कम नाही. या रकमेतून पारंपारिक संगीत नाटकं करणाऱ्या संस्थांना प्रयोगसंख्येनुसार सब्सिडी देता येईल. या योजनेचा प्राथमिक आराखडा मी तयार केला आहे. पैशासाठी सारं अडलं आहे. शासनानं हे अनुदान मान्य करावं आणि अर्थातच त्वरित धनादेश द्यावा. नाट्यपरिषद ही योजना राबवेल. म्हणजे शासनाची अंमलबजावणीची डोकेदुखी टळेल. माझी ही एकुलती एक आर्थिक मागणी आहे. शासन निराश करणार नाही असा मला विश्वास आहे.

संगीत रंगभूमीसारखंच प्रायोगिक रंगभूमीचंही आजचं चित्र फारसं उत्साहवर्धक नाही असं मला वाटतं. स्वातंत्र्योत्तर काळात प्रायोगिक रंगभूमीचा उदय झाल्यावर प्रारंभी ज्या वेगानं आणि भिन्न दिशांनी तिचा विस्तार झाला त्यानं प्रायोगिक रंगभूमीविषयी खूप अपेक्षा निर्माण केल्या. पुढच्या काळात मात्र या अपेक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत. सुरुवातीचं झपाटलेपण, प्रखर निष्ठा आणि वेगळी वाट चोखाळायची आंतरिक ऊर्मी ही ओसरायला लागली. अनुकरणप्रियतेनं कळस गाठला. त्याचबरोबर आपण करतो तेच नाटक ही वृत्ती वाढीला लागली. नाटक प्रेक्षकांसाठी असतं (प्रेक्षकांसाठी असतं म्हणजे प्रेक्षकशरण असतं असं नव्हे) हे गृहीत तत्वं नाकारण्यात प्रायोगिक रंगभूमीचे अनुयायी धन्यता मानू लागले. आमचं नाटक प्रेक्षकांकरता नसतंच मुळी ही एक तुच्छतावृत्ती काळजीपूर्वक जोपासली गेली. नाटकाचं प्रायोगिक मूल्य हे प्रयोगशीलतेत असतं जी ऊर्मी आतून यावी लागते. प्रायोगिकता केवळ बाह्यरुपात नसते. नाटकाकरता चौकट असते, चौकटीकरता नाटक नसतं याचा विसर पडला. परिणामी प्रायोगिक नाटकांचं एक बेगडी विश्व उभं राहिलं. दुर्बोध लेखन, कोरसचा वापर, पात्रांचा भिंती, खिडक्या,